अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा बादशहा नवा काळ

# सत्तांतर म्हणजे लोकशाही नव्हे

जगातल्या सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशातली सर्वात मोठी निवडणुक प्रक्रीया पूर्ण झाली. सव्वाशे कोटी लोकसंख्या असलेल्या या देशात जेवढे मतदार आहेत त्यांना सर्वांना मतदानाचा हक्क बजावता यावा याची पूर्ण व्यवस्था जवळपास साडेनऊलाख मतदान केंद्राची उभारणी त्यासाठी जवळपास ५० लाख कर्मचाऱ्यांचे सहकार्य आणि ८० लाख मतदारांचा हक्क असे सगळे समीकरण जुळवून निवडणुकीचे गणित यशस्वी करण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाने केला. त्यात आयोगाला किती टक्के गुण मिळतील किंवा द्यायचे हा भाग वेगळा. परंतु हे सगळे गणित जुळवून आणल्याबद्दल निवडणूक आयोगाला श्रेय दिले पाहिजे. पाच टप्प्यात देशभरातली मतदान प्रक्रीया शक्य तितक्या शांततेने आणि सुरळीतपणे घडवून आणण्याचे एक मोठे आव्हान आयोगासमोर होते. आपला देश जगातला सर्वात मोठा लोकशाहीवादी देश म्हणून आपण आपलीच पाठ थोपटून घेतो.परंतु त्यातून जगापुढे जो आदर्श या सर्वात मोठ्या लोकशाहीने किंवा निवडणूक प्रक्रीयेने घालून द्यायला हवा तो आपण निर्माण करू शकलेलो नाही. ही त्यातली तितकीच सर्वात मोठी खंत आहे. लोकसभा निवडणुकीची प्रक्रीया पूर्ण झाली परंतु ती परिपूर्ण नाही हे या निवडणुकीतून पुन्हा स्पष्ट झाले. तीच अवस्था आपण कौतुक करीत असतो त्या लोकशाही नावाची व्यवस्था आहे पण तिची अवस्था समाधानकारक नाही हेही तितकेच खरे आहे. आज ६६ वर्षानंतर १६ व्या निवडणुकीतही त्याच त्या त्रूटी राहात असतील. तर त्याचा निश्चितच विचार करावा लागेल. या लोकसभा निवडणुकीची सगळी प्रक्रीया जवळपास दीड महिना सुरू होती. अगदी वैशाख वणव्यामध्ये निवडणुकीचा हा हंगाम अनेक सरकारी यंत्रणांची परीक्षा पाहणारा होता. अगदी सर्व प्रकारच्या सरकारी कर्मचाऱ्यांना, सुरक्षा यंत्रणांना निवडणूक सुरळीत पार पाडणे ही एकमेव काळजी होती. लोकशाही सशक्त आहे.हे जगाला समजावे अशी इच्छा असेल तर आयोगाला निवडणूक व्यवस्थित पार पाडणे हे एकच उद्दीष्ट ठेवणे क्रमप्राप्त होते. अर्थातच या सगळ्या व्यवहारात मतदार हा घटक सर्वात महत्वाचा होता. निवडणुकीला उभ्या असणाऱ्या उमेदवारापेक्षा निवडणुक आयोगाला मतदाराची काळजी घेणे गरजेचे ठरते. आता त्यात आयोगाच्या कारभारात त्रूटी राहिल्या. देशभरात अनेक ठिकाणी मतदारांची लाखोच्या संख्येने नावे वगळली गेल्याच्या तक्रारी झाल्या. त्याची सखोल चौकशी झाली पाहिजे. त्यामागे काही कारस्थान झाले नाही ना याची खातरजमा होणे आवश्यक ठरते. परंतु यानिमित्ताने एक अतिशय महत्वाची आणि ठळक बाब समोर आली. ती म्हणजे निवडणूक आणि लोकशाही यांचा एकमेकांशी किती संबंध आहे. असलाच तर तो किती घनिष्ट आणि सशक्त आहे आणि या निवडणुकीच्या प्रक्रीयेतून लोकशाहीच्या मूल्यांचे कितपत संरक्षण आणि संवर्धन होते. निवडणूका या जर एकूण लोकशाही व्यवस्थेतले प्रमुख साधन आणि माध्यम असेल तर या राबवण्याचे काम करणाऱ्या निवडणूक आयोगाचे लोकशाहीतले स्थानही तेवढेच मजबूत असणे गरजेचे ठरते.

## इतका संकुचित अर्थ नसावा

आपल्या देशात निवडणुका म्हटल्या की राजकीय पक्षांना सत्ता प्राप्तीचे एक साधन वाटते तर सामान्य माणसाला ते सत्तांतराचे एकमेव माध्यम वाटते. आणि या दोघांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे काम आपले आहे असे निवडणूक आयोगाला वाटत असते. परंतु निवडणुकांचा इतका मर्यादित अर्थ आहे निवडणुकांकडे इतक्या संकुचित दृष्टीकोनातून पाहणे योग्य आहे. निवडणुक आयोगाने देखील केवळ यंत्रणा म्हणून स्वत:ला बंदिस्त करुन घेणे कितपत योग्य ठरते. अशा काही मुद्दांचा विचार व्हायला हवा. आज संसद, विधीमंडळ यांना आपण याच लोकशाहीची सार्वभौम सभागृहे म्हणतो परंतु आज त्या सभागृहांची प्रतिष्ठा कितपत टिकवली जाते. तिथे घातला जाणारा गोंधळ या सभागृहात गुन्हेगारांनाही निवडून येण्याची संधी मिळत असेल तर मग लोकशाहीची एकूणच पत आणि प्रतिष्ठा कुठे शिल्लक राहते. लोकशाहीचे नाव घ्यायचे. त्यासाठी निवडून यायची आणि गडगंज पैसा कमवायचा ही कोणती पध्दती आहे. भ्रष्टाचाराचे मोकळे रान म्हणजे आजचे राजकारण असे आजचे चित्र आहे. निवडणूक आयोगाने निवडणूक खर्चावर मर्यादा घातली असतानाही त्याची तमा कोणीही बाळगत नाही. प्रत्यक्षात मर्यादेपेक्षा दहापट जास्त खर्च होतो मग आपण कोणत्या लोकशाहीची चर्चा करतो. खरे तर आज या लोकशाहीशी संबंधित सर्वच प्रक्रीयांबाबत आणि पध्दतीबाबत सुधारणा होण्याची गरज आहे. निवडून येणारा प्रतिनिधी नंतर संसद आणि विधीमंडळ नावाच्या अभयारण्यात सोडला जातो. त्याच्यावर कोणाचेही नियंत्रण राहात नाही. खरे सांगायचे तर आपण नियंत्रित लोकशाहीच्या माध्यमातून एका अनियंत्रित राजकीय व्यवस्थेला जन्माला घातले ती व्यवस्था लोकशाहीला नियंत्रित करीत असते.

## निवडणूक आयोगाची भूमीका विस्ताराची

या मुद्दांचा विचार केला तर सर्वात मोठ्या लोकशाहीवादी देशातली सर्वात मोठी निवडणुक प्रक्रीया पूर्ण करणाऱ्या निवडणुक आयोगाकडे लोकशाही व्यवस्थेत अधिक जबाबदार भूमीका असायला हवी. केवळ मतदान यंत्रणा राबवणारी केवळ निवडणुका आयोजित करणारी व्यवस्था म्हणून निवडणूक आयोगाचा अधिकार न राहता ज्यांना निवडून दिले जाते त्यांच्यावर निवडून आल्यानंतरही वचक ठेवण्याचे काम आयोगाकडे दिले जायला काही हरकत नाही जे मतदार मतदान करतात त्यांच्या अपेक्षांप्रमाणे कामे न करणाऱ्यांना परत बोलवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाला देता येऊ शकतो. ती एक स्वायत्त संस्था आहे. तिचे सध्याचे स्वरुप अधिक विस्तृत आणि लोकशाहीच्या मूल्यांशी अधिक निगडीत केले पाहिजे. याचे महत्वाचे कारण म्हणजे एकदा निवडणुकांचे निकाल लागले की लोकप्रतिनिधी आणि मतदारांचा कवडीमात्र संबंध राहात नाही. आपल्या बेजबाबदार लोकप्रतिनिधीविषयी तक्रार करण्याचे कोणतेच माध्यम आज मतदाराला उपलब्ध नाही. निकालानंतर आयोगाचा निवडून येणाऱ्याशी आणि निवडून देणाऱ्याशी तसेच निवडून आलेल्यांचा आणि मतदारांशी कोणत्याच प्रकारचा संबंध राहात नाही. मग त्या एवढ्या मोठ्या लोकशाहीव्यवस्थेतल्या एवढ्या मोठ्या निवडणूक प्रक्रीयेला काय अर्थ राहिला. असा मुलभूत प्रश्न निर्माण होतो. कमीत कमी विजयी उमेदवार आणि अनेक अपेक्षा बाळगून विश्वासाने मतदान करणारा मतदार या दोघांमधला दुवा म्हणून तरी निवडणूक आयोगाकडे काम दिले गेले पाहिजे. ही व्यवस्था निर्माण करण्यासाठी कायदेशीर सुधारणा कराव्या लागतील. परंतु मतदाराला दाद मागण्याची एखादी तरी जागा उपलब्ध होईल. राजकारण्यांच्या भरोशावर लोकशाहीचे भवितव्य सोडणे म्हणजे अभयारण्यातल्या हिंस्रश्वापदांना आयते खाद्य पुरवण्यासारखे ठरते. सोळाव्या लोकसभा निवडणुकीचे अनुभव घेतल्यानंतर लोकशाहीचे भवितव्य आणि निवडणुका यांचा खरोखर किती घनिष्ट संबंध असा विचार आल्याशिवाय राहिला नाही. आज ना उद्या हा मुद्दा प्रकर्षाने पुढे येईल. सत्तांतर म्हणजे लोकशाही नाही हे अधोरेखित करावे लागेल.